**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी राजस्थानच्या दौऱ्यावर / ५ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं केलं लोकार्पण आणि पायाभरणी

- राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकसभेतले खासदार पी. पी. फैजल यांचं सदस्यत्व रद्द

- सिक्कीममध्ये ढगफुटीमुळे आलेल्या पुरात मृतांची संख्या १४, १०२ पेक्षा जास्त लोक अद्याप बेपत्ता

- आशियाई क्रीडास्पर्धांमधे भारताची आजवरची सर्वाधिक पदकांची कमाई

**आणि**

- क्रिकेट विश्वचषकस्पर्धेला आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर प्रारंभ/ पहिला सामना इंग्लंड आणि न्यूझीलंड मधे रंगणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राजस्थानच्या दौऱ्यावर आहेत. आज सकाळी जोधपूर इथं एका कार्यक्रमात त्यांनी ५ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी केली. जोधपूर आयआयटी चा नवीन परिसर आणि अनेक महामार्ग यांचा त्यात समावेश आहे. राजस्थानातल्या दोन नवीन रेल्वेगाड्यांनाही प्रधानमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

राजस्थानच्या जनतेसाठी केंद्रसरकार अनेक योजना राबवत असून काँग्रेस सरकारने आजवर फक्त भ्रष्टाचारच जनतेच्या झोळीत टाकला अशी टीका मोदी यांनी जाहीर सभेत केली.

**<><><><><>**

केंद्रीय भूविज्ञान मंत्री किरेन रिजिजू यांनी महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यातल्या महाबळेश्वर मधल्या ‘हाय अल्टिट्यूड क्लाउड फिजिक्स’ प्रयोगशाळेला भेट देऊन पाहणी केली. ही प्रयोगशाळा पुण्यामधल्या भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेची शाखा म्हणून कार्यरत आहे. हे केंद्र प्रामुख्यानं मान्सूनच्या पावसाशी संबंधित ढगांच्या हालचालींचा अभ्यास करतं. आपल्या भेटीदरम्यान रिजिजू यांनी केंद्रातल्या विविध विभागांची पाहणी करून तिथल्या कामाची माहिती घेतली, आणि केंद्रामधल्या शास्त्रज्ञांशी अनौपचारिक संवाद साधला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकसभेतले खासदार पी. पी. फैजल यांना सदस्यत्वासाठी अपात्र घोषित करण्यात आलं आहे. हत्येचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्याप्रकरणी फैजल यांना सुनावण्यात आलेली शिक्षा स्थगित करण्यास केरळ उच्च न्यायालयानं नकार दिल्यानं हा निर्णय घेण्यात आल्याचं लोकसभा सचिवालयानं म्हटलं आहे. लक्षद्वीप मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आलेले फैजल यांचं सदस्यत्व त्यांना शिक्षा झालेल्या दिवसापासून म्हणजे यावर्षी ११ जानेवारीपासून रद्द करण्यात आल्याचं लोकसभा सचिवालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

सिक्कीममध्ये ढगफुटीमुळे आलेल्या पुरात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या १४ वर पोहोचली असून १०२ पेक्षा जास्त लोक अद्याप बेपत्ता आहेत. उत्तर सिक्कीममधल्या लोनाक तलाव परिसरात काल ढगफुटी झाली. त्यामुळे लाचेन खोऱ्यातल्या तीस्ता नदीला अचानक पूर आला. या ठिकाणी NDRF, अर्थात

राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या तीन तुकड्या तैनात करण्यात आल्या असून, गोहाटी आणि पाटणा इथून आणखी दोन तुकड्या निघाल्या आहेत. बेपत्ता झालेल्यांचा शोध सुरु आहे. चुंगथांग, लाचेन आणि लाचुंग इथल्या पूरग्रस्त भागाला विमानामधून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जाणार आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्यांना सर्वतोपरी मदत मिळेल असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलं आहे. सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांच्याशी काल संवाद साधून त्यांनी पूरस्थितीचा आढावा घेतला.

**<><><><>**

सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीनं काल दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणी आम आदमी पक्षाचे राज्यसभेतील खासदार संजय सिंग यांना अटक केली.

संजय सिंग यांना नवी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी छापा टाकल्यानंतर अटक करण्यात आली. या प्रकरणी अटक करण्यात आलेले ते आपचे तिसरे नेते आहेत. यापूर्वी, आपचे सत्येंद्र जैन आणि मनीष सिसोदिया यांना अटक करण्यात आली आहे. आता रद्द करण्यात आलेल्या दिल्ली उत्पादन शुल्क धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये अनियमितता केल्याच्या आरोपावरून या तिघांना अटक करण्यात आली आहे.

**<><><><>**

जागतिक बाजारातल्या सकारात्मक संकेतांच्या पार्श्वभूमीवर मुंबई शेअर बाजारात आज सकाळच्या सत्रात तेजीचा जोर राहिला. मात्र त्यानंतर निर्देशांकात चढ-उतार कायम राहिले. बुधवारच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराच्या दोन्ही निर्देशांकांनी घसरण नोंदवली होती.

<><><><>

हाँगझो आशियाई क्रीडा स्पर्धांमधे आज भारताच्या पुरुष कबड्डी संघाने ग्रुप ए च्या सामन्यात तैवानचा ५० विरुद्ध २७ गुणांनी पराभव केला. भारताचा पुढचा सामना आता जपानबरोबर होणार आहे. स्क्वॅशमधे मिश्रगटात दीपिका पल्लिकल आणि हरिंदर संधू यांच्या जोडीने मलेशियाच्या जोडीचा २-० असा पराभव करुन सुवर्णपदकाला गवसणी घातली. स्पर्धेच्या अकराव्या दिवशी काल भारतीय खेळाडूंनी तीन सुवर्ण, पाच रौप्य आणि चार कास्यपदकांसह बारा पदकं जिंकली. यामुळं ८१ पदकांसह भारत पदक तालिकेत चौथ्या स्थानावर आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.

<><><><>

क्रिकेटरसिकांचं लक्ष लागून राहिलेली आयसीसी मर्यादीत षटकांची क्रिकेट विश्वचषक स्पर्धा आजपासून  सुरू होत आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट मैदानावर इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या सामन्यानं या स्पर्धेची सुरुवात होणार आहे. दोन्ही संघ गेल्या स्पर्धेतील अंतिम फेरीतील स्पर्धक असून इंग्लंड गतविजेता आहे. दरम्यान, भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं उद्घाटन समारंभ न करण्याचा निर्णय घेतला आहे. भारताचा पहिला सामना रविवारी आठ ऑक्टोबर रोजी चेन्नईच्या एमए चिदंबरम मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे. स्पर्धेतील बहुप्रतिक्षित सामन्यांपैकी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ ऑक्टोबर रोजी अहमदाबाद इथं होणार आहे.

<><><><>

केंद्रीय  युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी आज छत्तीसगडची राजधानी रायपूर इथं  नेहरू युवा केंद्र संघटनेनं  आयोजित केलेल्या दोन दिवसीय

राज्यस्तरीय युवा महोत्सवाचं उद्घाटन केलं. रायपूरमध्ये रावतपूर विद्यापीठ परिसरात आयोजित केलेल्या या युवा महोत्सवात छत्तीसगडच्या २८ जिल्ह्यांमधले जवळजवळ पाचशे युवक सहभागी झाले आहेत.

महोत्सवादरम्यान चित्रकला, कविता, मोबाईल फोटोग्राफी, भाषण, समूह नृत्य स्पर्धा होतील. या राज्यस्तरीय स्पर्धेच्या विजेत्यांना राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळेल. स्वातंत्र्याच्या अमृतकाळासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या ‘पंचप्रण’ संकल्पाच्या अनुषंगाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रायपूर दौऱ्यादरम्यान केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर काही मीडिया ऍप्स चं उदघाटनही करणार आहेत.

<><><><><>

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज मागवले आहेत. पात्र क्रीडापटू, प्रशिक्षक, संस्था आणि विद्यापीठांनी दोन नोव्हेंबरपर्यंत संकेतस्थळावर अर्ज पाठवावेत असं आवाहन क्रीडा मंत्रालयानं केलं आहे. यासाठीच्या पोर्टलवरच ऑनलाइन अर्ज करायचे असून, अंतिम मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

आज राष्ट्रीय डॉल्फिन दिवस साजरा होत आहे. नेपाळ, भारत आणि बांगलादेशमध्ये गंगा-ब्रह्मपुत्रा-मेघना आणि कर्णफुली-सांगू या नद्यांच्या पाण्यात डॉल्फिन माशाचा वावर आढळून येतो. या सागरी जीवाचं संरक्षण आणि संवर्धन व्हावं, यासाठी वन्यजीव तज्ज्ञ, प्राणी प्रेमी आणि पर्यावरण तज्ज्ञ यांनी केलेल्या मागणीवरून राष्ट्रीय वन्यजीव मंडळानं २०२२ मध्ये ५ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय डॉल्फिन दिवस म्हणून घोषित केला होता.

बिहार या राज्यानं गंगेमधल्या डॉल्फिन माशाच्या संवर्धनात महत्वाची भूमिका बजावली असून बिहार सरकारच्या मागणीवरून केंद्रसरकारनं 'गंगा डॉल्फिनला' २०१० मध्ये राष्ट्रीय जलचर म्हणून घोषित केलं होतं. बिहारमध्ये 'सौंस' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या गंगा डॉल्फिनचं वास्तव्य प्रामुख्यानं गंगा, गंडक, कोसी आणि महानंदा या नद्यांमध्ये आढळून येतं.

<><><><><>

अमेरिकेच्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हचे सभापती केविन मॅकार्थी यांची पदावरून गच्छंती झाल्यानंतर सभापतीपदाच्या शर्यतीने वेग घेतला आहे. मॅकार्थी यांचे उत्तराधिकारी म्हणून ओळखले जाणारे स्टिव्ह स्कॅलिस आणि बायडेन सरकारविरोधक जिम जॉर्डन यांनी या पदासाठी इच्छूक असल्याचं सांगितलं. रिपब्लिकन पक्षात स्कॅलिस हे मॅकार्थींहून अधिक प्रतिगामी म्हणून ओळखले जातात. तर पक्षाचे महत्त्वपूर्ण नेते असलेले जॉर्डन हे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे समर्थक मानले जातात. मॅकार्थी यांनी डेमोक्रॅटिक पक्षाशी समझोता करण्याबाबत त्यांचे सहकारी नाराज होते. मॅकार्थी यांच्या हकालपट्टीमुळे अमेरिकेचा युक्रेनला पाठिंबा देण्याचा निर्णय अडचणीत आला आहे.

<><><><><>

युक्रेनचा युरोपीय महासंघात समावेश करण्याबाबत संघाची युक्रेनशी चर्चा सुरू असून त्याबाबत येत्या डिसेंबर महिन्यात घोषणा केली जाणार आहे. युरोपीय महासंघात युक्रेनचा या वर्षाच्या अखेरपर्यंत समावेश करण्याबाबत संघातील नेत्यांनी होकार दिल्याचं संघाच्या तीन नेत्यांनी सांगितलं.

युपोपीय संघाच्यागेल्या महिन्यात झालेल्या वार्षिक बैठकीत युरोपीय आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला व्हान देर लिएन यांनी युक्रेनच्या युरोपीय संघाच्या सहभागाबाबत संकेत दिले होते.

**<><><><><>**

जपानच्या पश्चिमेला पॅसिफिक महासागरात आज सकाळी ६ पूर्णांक ६ दशांश रिक्टर स्केल क्षमतेचा भूकंप झाला. इझु चाईन मध्ये तोरिशिमा जवळच्या समुद्रात १० किलोमीटर खोलीवर या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. भूकंपा नंतर येणाऱ्या त्सुनामीची शक्यता लक्षात घेता हवामान विभागानं या भागातल्या नागरीकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. किनारपट्टी भागातल्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचे निर्देश स्थानिक प्रशासनानं दिले आहेत.

**//<><><><><>//**